# योहानाचे दुसरे पत्र

1वडिलाकडून, देवाने निवडलेल्या बाईला व तिच्या मुलांना,
सत्यात सहभागी असलेल्या लोकांप्रमाणे ज्यांच्यावर मी प्रीती
करतो, आणि तुमच्यावर प्रीती करणारा मी एकटाच नाही, तर
ज्यांची सत्याशी ओळख झाली आहे असे सर्वजणसुद्धा प्रीती
करतात. 2या सत्यामुळे जे आमच्यामध्ये असते, ते आमच्यामध्ये
अनंतकाळपर्यंत राहील.

3देवपित्यापासून आणि पित्याचा पुत्र प्रभू येशू ख्रिस्त
याच्यापासून कृपा, दया व शांती ही सत्यात व प्रीतीत आपणाबरोबर
राहोत.

4पित्याने आपल्याला दिलेल्या आज्ञेप्रमाणे तुमची काही मुले
सत्यात चालतात असे मला दिसून आले म्हणून मला फार आनंद
झाला. 5आणि आता, कुरियाबाई, मी तुला नम्रपणे विनंती करतो
की, आपण एकमेकांवर प्रीती करावी. मी ही तुला नवी आज्ञा करतो
असे नाही, तर जी प्रारंभापासून देण्यात आलेली होती, 6आणि
त्याच्या आज्ञेत राहणे म्हणजेच प्रीती करणे होय. हीच आज्ञा आहे
जी तुम्ही सुरुवातीपासून ऐकली आहे : की तुम्ही प्रीतीचे जीवन
जगावे.

7येशू मानवी देह धारण करून या जगात आला या गोष्टीवर
विश्वास न ठेवणारे अनेक फसवे भोंदू लोक जगात निघाले आहेत.
असा फसवणारा भोंदू मनुष्य हाच ख्रिस्तविरोधी होय. 8सावध
असा! यासाठी की ज्यासाठी आम्ही काम केले ते तुम्ही हातचे
जाऊ देऊ नये तर त्याचे पूर्ण प्रतिफळ तुम्हांला मिळावे.

9जो मनुष्य ख्रिस्ताविषयीच्या शिकवणुकीप्रमाणे चालत नाही,
तर तिचे उल्लंघन करतो, त्याला देव मिळाला नाही. जो कोणी
ख्रिस्ताविषयीच्या शिकवणुकीप्रमाणे चालतो त्याला देवपिता व
पुत्र असे दोन्ही मिळाले आहेत. 10जर एखादा मनुष्य तुमच्या घरी
आला आणि ख्रिस्ताची शिकवण आचरणात आणत नसला तर
त्याला आपल्या घरात घेऊ नका, किंवा त्याला सलामही करू नका.
11कारण अशा मनुष्याला जो कोणी सलाम करतो तो त्याच्या वाईट
कामांमध्ये सहभागी होतो.

12मला जरी अनेक गोष्टी तुम्हांला लिहायच्या आहेत तरी त्या
तुम्हांला मी शाई व लेखणीने लिहू इच्छित नाही. तर त्याऐवजी
तुम्हांला भेटावे व प्रत्यक्ष सर्वकाही बोलावे अशी आशा मनात
बाळगून आहे. म्हणजे आपला आनंद त्यामुळे परिपूर्ण होईल.
13देवाने निवडून घेतलेल्या तुमच्या बहिणीची मुले तुम्हांला
सलाम सांगतात.

## नोंद